IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील पिक प्रारूप आणि सिंचन क्षेत्राचा एक भौगोलिक अभ्यास

डॉ. अंकुश शंकर शिंदे , श्री धूळोबा बाळू वाघमोडे, सौ सविता वाघमारे

प्राध्यापक , सी. बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट.
श्री.छत्रपती शिवाजी महाराज महाविद्यालय, उमरगा , जिल्हा- उस्मानाबाद
सहायक प्राध्यापक (तासिका तत्त्व), भूगोल विभाग, सी. बी. खेडगीज् बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट

Article Info

Article History:
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

Keywords:
पिक प्रारूप भूधारण क्षेत्र,
सिंचन क्षेत्र,
पिक उत्पादन

ABSTRACT

कोणत्याही कृषी प्रदेशातील पिक प्रारूप हे त्या प्रदेशाचे कृषी धोरण स्पष्ट करत असते. थोडक्यात पिक प्रारुपावर तेथील हवामानाचा, प्राकृतिक रचनेचा परिणाम होत असतो. त्यामुळे वैशिष्ठेपूर्ण प्रदेशात वैशिष्ठेपूर्ण पिक-प्रारूप आढळते. काही विशिष्ठ पिके त्या प्रदेशाची मुख्य पिके म्हणून ओळखली जातात. प्रारूप (cropping pattern) म्हणजे एखाद्या शेतजमिनीवर कोणत्या पिकांची आणि कोणत्या क्रमाने लागवड केली जाते याचे नियोजन होय कि ज्यामध्ये हवामान, मातीचा प्रकार, पाणी उपलब्धता आणि बाजारपेठेची मागणी या घटकांचा विचार करून पिकांची निवड केली जाते. याचा मुख्य उद्देश जमिनीची सुपीकता टिकवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे तसेच कमी संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करणे हा असतो. शेतकरी पिक प्रारूपामध्ये एकाल पिक पद्धत, बहूपिक पद्धत किंवा पिक फेरपालट पद्धत अवलंबतात. सिंचन क्षेत्र म्हणजे शेतजमिनीचा असा भाग जिथे पिकांना वाढीसाठी पावसाव्यतिरिक्त कृत्रिमरित्या पाणी पुरवले जाते. हे क्षेत्र विशिष्ट सिंचन प्रकल्पांतर्गत येते, जसे की कालवे किंवा विहिरींमधून पाणी दिले जाते. सिंचन क्षेत्र हे जमिनीचे असे क्षेत्र आहे, ज्याला सिंचन व्यवस्थेद्वारे पाणी मिळते आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची पूर्तता केली जाते.

प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्याचा सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांच्या अधिपत्याखाली असणारी भूधारण क्षेत्र, पिक प्रारूप व्यवस्थापन , त्यांचे सिंचन क्षेत्र क्षमता, सिंचन तीव्रता याचा अभ्यास केला जाणार आहे.

Plagiarism Check Report:
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 7%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

How to Cite: Shinde, A. S., Waghmode, D. B., & Waghmare, S. (2025). **सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील पिक प्रारूप आणि सिंचन क्षेत्राचा एक भौगोलिक अभ्यास.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 856–863.

प्रास्ताविक

कोणत्याही कृषी प्रदेशातील पिक प्रारूप हे त्या प्रदेशाचे कृषी धोरण स्पष्ट करत असते. थोडक्यात पिक प्रारुपावर तेथील हवामानाचा, प्राकृतिक रचनेचा परिणाम होत असतो. त्यामुळे वैशिष्ठेपूर्ण प्रदेशात वैशिष्ठेपूर्ण पिक-प्रारूप आढळते. काही विशिष्ठ पिके त्या प्रदेशाची मुख्य पिके म्हणून ओळखली जातात. प्रारूप (cropping pattern) म्हणजे एखाद्या शेतजमिनीवर कोणत्या पिकांची आणि कोणत्या क्रमाने लागवड केली जाते याचे नियोजन होय कि ज्यामध्ये हवामान, मातीचा प्रकार, पाणी उपलब्धता आणि बाजारपेठेची मागणी या घटकांचा विचार करून पिकांची निवड केली जाते. याचा मुख्य उद्देश जमिनीची सुपीकता टिकवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे तसेच कमी संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करणे हा असतो. शेतकरी पिक प्रारूपामध्ये एकाल पिक पद्धत, बहूपिक पद्धत किंवा पिक फेरपालट पद्धत अवलंबतात. सिंचन क्षेत्र म्हणजे शेतजमिनीचा असा भाग जिथे पिकांना वाढीसाठी पावसाव्यतिरिक्त कृत्रिमरित्या पाणी पुरवले जाते. हे क्षेत्र विशिष्ट सिंचन प्रकल्पांतर्गत येते, जसे की कालवे किंवा विहिरींमधून पाणी दिले जाते. सिंचन क्षेत्र हे जमिनीचे असे क्षेत्र आहे, ज्याला सिंचन व्यवस्थेद्वारे पाणी मिळते आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची पूर्तता केली जाते.

अक्कलकोट तालुका हा सोलापूर जिल्ह्याच्या आग्नेय भागात बोरी आणि हरणा नदीचे खोऱ्यात वसलेला आहे. त्याच्या उत्तरेला उस्मानाबाद जिल्हा**,** पूर्वेला कर्नाटकचा विजयपूर (विजापूर) जिल्हा आणि पश्चिमेला दक्षिण सोलापूर तालुका वसलेला आहे. याचा अक्षवृत्तीय १७°१७'५४" उत्तर ते १७°४४'३" उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७५°५३'४२" पूर्व ते ७६°२५'४३" पूर्व आहे. येथील हवामान कोरडे आणि उष्ण स्वरूपाचे असून मार्च ते मे महिन्यात अत्याधिक तापमान आणि नोव्हेबर ते जानेवारी महिन्यात कमी तापमानाची नोंद होते . सन २०२३ नुसार जिल्ह्याचा सरासरी पर्जन्यमान ४०० मिमी आहे. सन २०००-०१ मध्ये अक्कलकोट तालुक्यात एकूण पिकाखालील क्षेत्र १०३९९८ हेक्टर होते तर ते सन २०१५-१६ मध्ये १३८१६५ हेक्टर होते. तसेच निव्वळ जलसिंचित क्षेत्र आणि निव्वळ पिकाखालील क्षेत्र यांचे गुणोत्तर सन २०००-०१ साली सुमारे १२.८१% तर सन २०१५-१६ साली सुमारे ८.६०% इतके होते. तसेच एकूण जलसिंचित क्षेत्र आणि एकूण पिकाखालील क्षेत्राचे प्रमाण गुणोत्तर सन २०००-०१ साली सुमारे१२.६६ % तर सन २०१५-१६ साली सुमारे ९.८९ % इतके होते.

उद्दिष्टे

१) अक्कलकोट तालुक्यातील पिक प्रारुपतेचा आणि त्यात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

२) अक्कलकोट तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचा भू-धारण क्षेत्रातील सिंचित व असिंचित क्षेत्राचा अभ्यास करणे

३) सन २०००-०१ पासून २०१५-१६ या कालखंडात पिक प्रारुपतेमध्ये व सिंचन क्षेत्राचा झालेला बदल अभ्यास करणे.

संशोधन पद्धती

सन २०००-०१ आणि २०१५-१६ या वर्षाची कृषिविषयक आणि सन १९९१, सन २००१, सन २०११ या वर्षाची लोकसंख्याविषयक द्वितीयक सांख्यिकी आकडेवारी घेण्यात आलेली आहे. द्वितीयक सांख्यिकी आकडेवारी हि जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, कृषी विभागातर्फे प्रकाशित होणारे होणारे वार्षिक कृषी मासिके, लेख, बुलेटीन, जिल्हा प्राथमिक जनगणना पुस्तिका, कृषी पुस्तिका याचा आधार घेण्यात आलेला आहे.

अभ्यास क्षेत्र

अक्कलकोट तालुका हा सोलापूर जिल्ह्याच्या आग्नेय भागात बोरी आणि हरणा नदीचे खोऱ्यात वसलेला आहे. त्याच्या उत्तरेला उस्मानाबाद जिल्हा, पूर्वेला कर्नाटकचा विजयपूर (विजापूर) जिल्हा आणि पश्चिमेला दक्षिण सोलापूर तालुका वसलेला आहे. ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ सुमारे १४०१ चौरस किमी क्षेत्रफळाचे असून जिल्ह्यात तालुक्याचा क्षेत्रफळाच्या बाबतीत ६ वा क्रमांक लागतो. या तालुक्याला ऐतिहासिक आणि धार्मिक पार्श्वभूमी असून हा तालुका महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याच्या सीमेवर वसलेला आहे. याचा अक्षवृत्तीय १७°१७'५४" उत्तर ते १७°४४'३" उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७५°५३'४२" पूर्व ते ७६°२५'४३" पूर्व आहे.

विश्लेषण:-

अ) जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचे भू-धारण क्षेत्र

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचे भू-धारण क्षेत्र							
अ.क्र	शेतकरी / भू-धारक	भू-धारक शेतकऱ्यांची संख्या आणि टक्केवारी		फरक	भू धारक शेतकऱ्यांचे भू-धारक क्षेत्र (हेक्टरमध्ये आणि टक्केवारीमध्ये)		फरक
		२०००-०१	२०१५-१६		२०००-०१	२०१५-१६	
१	सीमांतिक	९३४१ (२१.८०%)	१४३५२ (२३.७२%)	५०११ (१.९२)	५०८१ (४.४७%)	८५५२ (६.६३%)	३४७१ (२.१६)
२	लहान	१२७७९ (२९.८३%)	२१०२९ (३४.७५%)	८२५० (४.९२)	१८१०९ (१५.९६%)	२२५३४ (१७.४९%)	४४०५ (१.५३)
३	निम- मध्यम	१३३४७ (३१.१५%)	१६९४५ (२८.००%)	३५९८ (३.१५)	३३७६९ (२५.३०%)	४२१८९ (३७.७२%)	८४२० (१२.४२)
४	मध्यम	६५८६ (१५.३७%)	७५७१ (१२.५१%)	९८५ (-२.८६)	४१११७ (३६.२४%)	४३३९१ (३३.६५%)	२२७४ (-२.५९)
५	मोठे	७८२ (१.८२%)	६०४ (०.९९%)	-१७८ (०.८३)	१५३८० (१३.५५%)	९२५२ (७.१७%)	-६१२८ (-६.३८)
	जिल्हा	४२८३५	६०५०१	१७६६६	११३४५४	१२८९१८	१५४६४

(लेखकाद्वारे संकलित)

भू-धारण क्षेत्रावरच शेतीचा विकास अवलंबून असतो. कारण कृषी विकासासाठी आवश्यक असणारी शेती-अवजारे व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा मुख्यत: भू-धारण क्षेत्राच्या आकारावर अवलंबून असतो. जितके क्षेत्र मोठे , तितके आधुनिक कृषी अवजारे आणि आधुनिक शेती सामग्री वापरणे सोयीचे जाते. लहान आकाराच्या भू-धारकांना आधुनिक कृषी यंत्र सामुग्री वापरणे त्यांच्या आर्थिक स्थितीमुळे शक्य होत नाही.

अक्कलकोट तालुक्यात सन २०००-०१ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे ११३४५४ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ४.४७% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे १५.९६% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे; सुमारे २५.३०% क्षेत्र निम-मध्यम शेतकऱ्याकडे; सुमारे ३६.२४% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे १३.५५% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे.

सन २०१५-१६ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे १२८११८ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ६.६३% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे १७.४९% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे; सुमारे ३७.७२% क्षेत्र निम-मध्यम

शेतकऱ्याकडे; सुमारे ३३.६५% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे ७.१७% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे.

ब) सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचे भू-धारण क्षेत्र

सिंचन क्षेत्र म्हणजे शेतजमिनीचा असा भाग जिथे पिकांना वाढीसाठी पावसाव्यतिरिक्त कृत्रिमरित्या पाणी पुरवले जाते. हे क्षेत्र विशिष्ट सिंचन प्रकल्पांतर्गत येते, जसे की कालवे किंवा विहिरींमधून पाणी दिले जाते. सिंचन क्षेत्र हे जमिनीचे असे क्षेत्र आहे, ज्याला सिंचन व्यवस्थेद्वारे पाणी मिळते आणि पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची पूर्तता केली जाते. सिंचनामुळे शेतकऱ्यांना पिक उत्पनाची शाश्वती मिळते. पिक विविधता आणि पिक एकत्रीकरण केले जाऊ शकते. शेतीमध्ये आधुनिक सुधारित वाण-बी-बियाणाचा वापर करता येतो. रासायनिक खतांचा वापर करता येतो. सिंचन क्षेत्र हे कालवे, विहिरी, तलाव, ठिबक किंवा तुषार सिंचन यांसारख्या कृत्रिम पद्धतींचा वापर करते.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील भू-धारक शेतकऱ्यांचे सिंचित आणि अ-सिंचित भू-क्षेत्र

अ.क्र	शेतकरी / भू-धारक	भू धारक शेतकऱ्यांचे भू-धारणक्षेत्र हेक्टरमध्ये (भू-धारण क्षेत्राचे तालुक्यामधील टक्केवारी) {भू-धारण क्षेत्रानुसार टक्केवारी }					शेतकरी / भू-धारक
		(२०००-०१)			२०१५-१६		
		जलसिंचित क्षेत्र	अ-जलसिंचित क्षेत्र		जलसिंचित क्षेत्र	अ-जलसिंचित क्षेत्र	
१	सीमांतिक	६८० (५.१६%) {१४.०३%}	४१६५ (४.५८%) {८५.९६%}		९४३ (६.८९%) {१०.५३%}	८००६ (६.४३%) {८९.४६%}	सीमांतिक
२	लहान	२४४४ (१८.५५) {१४.१६%}	१४८१० (१६.३०) {८५.१३%}		२५३५ (१८.५४%) {९.६६%}	२३६८५ (१९.०२%) {९०.६४%}	लहान
३	निम-मध्यम	३९५२ (३०.००%) {१२.४५%}	२७७८९ (३०.५९%) {८७.५४%}		४७४६ (३४.७१%) {१०.३३%}	३९४४५ (३१.६८%) {८९.६४%}	निम- मध्यम
४	मध्यम	४६३२ (३५.१७%) {१२.६१%}	३२०९९ (३५.३४%) (८७.३८%}		४७६४ (३४.८५%) {९.८३%}	४३६४५ (३५.०५%) {९०.१६%}	मध्यम
५	मोठे	१४६२ (११.१०%) {१०.८८%}	११९६५ (१३.१७%) ८९.१२%}		६८३ (४.९९%) {६.५९%}	९६७५ (७.७७%) {९३.४०%}	मोठे
	जिल्हा	१३१७०	९०८२८		१३६७०	१२४४९५	जिल्हा

(लेखकाद्वारे संकलित)

सन २०००-०१ मध्ये अक्कलकोट तालुक्यात एकूण १३१७० हे जल- सिंचित क्षेत्र होते . त्यापैकी सिमान्तिक भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ५.१६% ; लहान भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे १८.५५% ; निम-मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ३०.०% ; मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे ३५.१७% आणि मोठ्या भू-धारक शेतकऱ्याकडे सुमारे ११.१०% होते.

सन २०१५-१६ मध्ये एकूण अक्कलकोट तालुक्यात एकूण १३६७० हे जल- सिंचित क्षेत्र होते . त्यापैकी सिमान्तिक भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ६.८९% ; लहान भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे १८.५४% ; निम-मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे सुमारे ३४.७१% ; मध्यम भू- धारक शेतकऱ्याकडे ३४.८५% आणि मोठ्या भू-धारक शेतकऱ्याकडे सुमारे ४.९९% होते.

क) सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील पिक प्रारूप

पीक प्रारूप (cropping pattern) म्हणजे एखाद्या शेतजमिनीवर कोणत्या पिकांची आणि कोणत्या क्रमाने लागवड केली जाते याचे नियोजन होय कि ज्यामध्ये हवामान, मातीचा प्रकार, पाणी उपलब्धता आणि बाजारपेठेची मागणी या घटकांचा विचार करून पिकांची निवड केली जाते. याचा मुख्य उद्देश जमिनीची सुपीकता टिकवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे तसेच कमी संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करणे हा असतो. शेतकरी पिक प्रारूपामध्ये एकाल पिक पद्धत, बहूपिक पद्धत किंवा पिक फेरपालट पद्धत अवलंबतात. एकल पिक पद्धतीमध्ये एकाच पिकाची सातत्याने लागवड करतात तर बहुपिक पद्धतीमध्ये एकाच वेळी एकाच शेतात जास्त पिकाची लागवड करतात. यामध्ये मिश्र पिक पद्धत किंवा आंतरपीक पद्धत वापरतात. मिश्र पिक पद्धतीमध्ये एकाच शेतात एकाच वेळी दोन किंवा अधिक पिकांची लागवड करतात. तर आंतरपिक पद्धतीमध्ये एकाच शेतात एकापेक्षा जास्त पिके एकमेकांजवळ लागवड करून घेतात. पिक फेरपालट पद्धतीमध्ये एकाच जमिनीमध्ये वेगवेगळ्या हंगामामध्ये आलटून पालटून विविध पिकांची लागवड करून जमिनीची सुपीकता टिकवण्याचा प्रयत्न करतात. पिक प्रारुपाच्या विविध अवलंबिलेल्या पद्धतीमुळे जमिनीतील अन्नद्रव्याचा साठ समतोल राहून जमिनीची सुपीकता टिकून राहते, तसेच योग्य नियोजन केल्यामुळे पिकांचे उत्पादन वाढते, आणि एकाच पिकाच्या फेरपालटामुळे जमिनीतील कीटक आणि तणांचा प्रादुर्भाव कमी होत जातो.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील पिक प्रारूप								
अ.क्र	पिकांचे नांव	२०००-०१		फरक		२०१५-१६		पिकांचे नांव
		एकूण पिक व्याप्त क्षेत्र (हे)	**पिकांचे एकूण पिका खालील क्षेत्राशी गुणोत्तर (%)**	**एकूण पिक व्याप्त क्षेत्र (हे)**	**पिकांचे एकूण पिका खालील क्षेत्राशी गुणोत्तर (%)**	**एकूण पिक व्याप्त क्षेत्र (हे)**	**पिकांचे एकूण पिका खालील क्षेत्राशी गुणोत्तर (%)**	
१	तांदूळ	४४५	०.४२	२८२	०.०१	७२७	०.५२	तांदूळ
२	ज्वारी	५४६४१	५२.५४	-५७४	-१३.४१	५४०६७	३९.१३	ज्वारी
३	गहू	२५१७	२.४२	-२७७	-०.८	२२४०	१.६२	गहू
४	बाजरी	१४४०	१.३८	-११६७	-१.१९	२७३	०.१९	बाजरी
५	मका	२००	०.१९	२०७	०.१	४०७	०.२९	मका
६	इतर तृणधान्ये	८७	०.०९	-६१	-०.०४	२६	०.०५	इतर तृणधान्ये
अ)	**एकूण तृणधान्ये**	**५९३३०**	**५७.०४**	**-१५९०**	**-१५.२४**	**५७७४०**	**४१.८०**	**एकूण तृणधान्ये**
१	हरभरा	१३७६	१.३२	१३३८३	९.३६	१४७५९	१०.६८	हरभरा
२	तूर	२३५६१	२२.६५	१३१०१	३.८८	३६६६२	२६.५३	तूर

३	मूंग	१०२५	०.९८	१९५१	१.१७	२९७६	२.१५	मूंग
४	इतर कडधान्ये	२३५८	२.२८	४४७९	२.६७	६८३७	४.९५	इतर कडधान्ये
ब)	**एकूण कडधान्ये**	**२८३२०**	**२७.२३**	**३२९१४**	**१७.०८**	**६१२३४**	**४४.३१**	**एकूण कडधान्ये**
क)	**एकूण अन्नधान्ये**	**८७६४९**	**८४.२७**	**३१३२५**	**१.८४**	**११८९७४**	**८६.११**	**एकूण अन्नधान्ये**
१	भुईमुग	४३२९	४.१६	-३५५२	-३.६	७७७	०.५६	भुईमुग
२	करडी	५९२	०.५६	-५८३	-५६	०९	०.००	करडी
३	सुर्यफुल	१६१२	१.५५	४८७४	३.१५	६४८६	४.७०	सुर्यफुल
४	सोयाबीन	३७	०.०३	४२९	०.३	४६६	०.३३	सोयाबीन
ड)	**एकूण गळीत धान्ये**	**६५९५**	**६.३४**	**१४६९**	**-०.५१**	**८०६४**	**५.८३**	**एकूण गळीत धान्ये**
१	ऊस	६९२५	६.६५	-२३	-१.६६	६९०२	४.९९	ऊस
२	कापूस	७९६	०.७६	-७८९	-०.७६	७	०.००	कापूस
इ)	**एकूण नगदी पिके**	**७७२१**	**७.४२**	**-८१२**	**-२.४२**	**६९०९**	**५.००**	**एकूण नगदी पिके**
ई)	**एकूण फळे आणि भाजीपाला**	**३२८६**	**३.१५**	**-२७१७**	**-२.७४**	**५६९**	**०.४१**	**एकूण फळे आणि भाजीपाला**
१	एकूण मसाले	२६९	०.२५	८६	००	३५५	०.२५	एकूण मसाले
२	चारा व हिरवळी क्षेत्र	२१९	०.२१	-२१९	-०.२१	०	००	चारा व हिरवळी क्षेत्र
फ)	एकूण खाद्य पिके	९६२९७	९२.५९	३३७८८	१.५६	१३००८५	९४.१५	एकूण खाद्य पिके
च)	एकूण अखाद्य पिके	७७०१	७.४०	३७९	०.४४	८०८०	५.८४	एकूण अखाद्य पिके
	एकूण पिकाखालील क्षेत्र	**१०३९९८**		**३४१६७**		**१३८१६५**		**एकूण पिकाखालील क्षेत्र**

(लेखकाद्वारे संकलित)

सन २०००-०१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील एकूण पिकाखालील क्षेत्र सुमारे १०३९९८ हेक्टर असून त्यापैकी एकूण तृणधान्याखाली ५७.०४ % ; एकूण कडधान्याखाली २७.२३; एकूण अन्नाधान्याखाली ८४.२७ ; एकूण गळीत-धान्याखाली ६.३४% ; नगदी पिकाखाली ७.४२% ; एकूण फळे व भाजीपाल्याखाली ३.१५% आणि एकूण मासाल्याखाली ०.२५% होते.

अक्कलकोट तालुक्यात एकूण तृणधान्यापैकी सुमारे ०.७५ % तांदूळ पिकाखाली, सुमारे ९२.०९% क्षेत्र ज्वारी पिकाखाली; सुमारे ४.२४% गहू पिकाखाली क्षेत्र होते. तर एकूण कडधान्यापैकी सुमारे ८३.८९% तूर ; सुमारे ४.८५% हरभरा ; सुमारे ३.६१% मुग होते. तर एकूण गळीत धान्यापैकी सुमारे २४.४४% सुर्यफुल; सुमारे

६५.६४% भूईमुग; सुमारे ८.९७% करडी होते. एकूण नगदी पिकापैकी सुमारे ८९.६६% ऊस; सुमारे १०.३०% कापूस पिक होते.

सन २०१५-१६ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील एकूण पिकाखालील क्षेत्र सुमारे १३८१६५ हेक्टर असून त्यापैकी एकूण तृणधान्याखाली ४१.८० % ; एकूण कडधान्याखाली ४४.३१ %; एकूण अन्नाधान्याखाली ८६.११ %; एकूण गळीत-धान्याखाली ५.८३%; नगदी पिकाखाली ५.० %; एकूण फळे व भाजीपाल्याखाली ५.००% आणि एकूण मासाल्याखाली ०.२५ % होते.

अक्कलकोट तालुक्यात एकूण तृणधान्यापैकी सुमारे १.२५% तांदूळ पिकाखाली, सुमारे ९३.६३% क्षेत्र ज्वारी पिकाखाली; सुमारे ३.८७% गहू पिकाखाली क्षेत्र होते. तर एकूण कडधान्यापैकी सुमारे ५९.८७% तूर ; सुमारे २४.१०% हरभरा ; सुमारे ४.८६% मुग होते. तर एकूण गळीत धान्यापैकी सुमारे ५.७७ % सोयाबीन ; सुमारे ९.६३% भूईमुग; सुमारे ८०.४३ % सुर्यफुल होते. एकूण नगदी पिकापैकी सुमारे ९९.८९% ऊस; सुमारे ०.११% कापूस पिक होते.

निष्कर्ष :

१) सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्याचा पिक प्रारूपतेचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि अभ्यास संशोधन कालावधीत एकूण तृणधान्ये क्षेत्रात सुमारे १५.२४% ; एकूण गळीत धान्याखाली सुमारे ०.५१% ; एकूण नगदी पिकाखाली सुमारे २.४२%; एकूण फळे व भाजीपाला पिकाखालील क्षेत्रात सुमारे २.७४%; घट झाली तर एकूण कड-धान्याखालील क्षेत्रात सुमारे १७.०८% वाढ झाल्याचे दिसून येते.

२) सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्याचा सन २०००-०१ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे ११३४५४ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ४.४७% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे १५.९६% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे ; सुमारे २५.३०% क्षेत्र निम-मध्यम शेतकऱ्याकडे; सुमारे ३६.२४% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे १३.५५% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे. सन २०१५-१६ मध्ये कि एकूण भू -धारण क्षेत्र सुमारे १२८९१८ हेक्टर होते . त्यापैकी सुमारे ६.६३% क्षेत्र सिमान्तिक शेतकऱ्याकडे; सुमारे १७.४९% क्षेत्र लहान शेतकऱ्याकडे; सुमारे ३२.७२% क्षेत्र निम-मध्यम शेतकऱ्याकडे; सुमारे ३३.६५% क्षेत्र मध्यम शेतकऱ्याकडे आणि सुमारे ७.१७% क्षेत्र मोठ्या शेतकऱ्याकडे आहे.

३) सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील भू- धारण क्षेत्राचा अभ्यास केला असता सिमान्तिक प्रकारच्या भू-धारकांच्या संख्येत सुमारे १.१२% वाढ; लहान प्रकारच्या भू-धारकांच्या संख्येत४.९२%; आणि निम-मध्यम प्रकारच्या भू-धारकामध्ये सुमारे३.१५% झाल्याचे दिसून येते. तर उरलेल्या भू-धारकंच्या संख्येत घात झाल्याचे दिसून येते. म्हणजेच जमिनीचे तुकडीकरण होत आहे , असे दिसून येते. त्याचप्रमाणे सिमान्तिक आणि लहान प्रकारच्या भू-धारकांच्या भू-क्षेत्रात एकत्रित सुमारे १६.११% वाढ दिसून येते तर अन्य भू-धारकांच्या भू-क्षेत्रात घट दिसून येते

संदर्भ ग्रंथ

१) Socio economic Abstract of Solapur District.
२) A New geography of Maharashtra : Afzal Sharieff , Massod Ali Khan, A. Balakishan.
३) Geography of Maharashtra –Dr. S. M. Bhamare.
४) Census of Maharashtra.
५) Economic Review of Maharashtra

६) Agricultural Geography- Masjid Hussain

७) डॉ. अंकुश शंकर शिंदे श्री धूळोबा बाळू वाघमोडे **"कृषी भू-धारण क्षेत्र आणि सिंचन क्षेत्राचा भौगोलिक अभ्यास : विशेषत: सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमातीतील शेतकऱ्यांचा एक नमुना अभ्यास"** International Journal of Advance and Applied Research (IJAAR) Impact Factor – 7.328 ISSN – 2347-7075 , Vol.4, Issue Dec 202

८) Shri Shinde A.S. 2017, **" Cropping Pattern & Irrigation Status of Marginal Agricultural Cultivators"** Published in **WIZCRAFT** Publication & Distribution Pvt Ltd. ISBN NO 978-93-86013-43-9 held at Mandrup dated 18th Feb 2017.

९) Shri Shinde A.S. 2013, ***"The Demographic Characteristics of Scheduled Caste populations in Solapur district."*** Published in '***Review of Research'*** International Online Multidisciplinary Journal Vol 3, Issue 1, Oct 2013 2.1002(UIF) 2249-849X

१०) Shri Shinde A.S. ***"Disparity Level in Agricultural Development in Solapur District"*** Special issue of an International Scholarly **Research Journal for Interdisciplinary studies**, 30 Jan 2018 SJIF (2016)-6.177 ISSN 2349-4766(P), 2278-8808(E)

११) डॉ. अंकुश शंकर शिंदे श्री धूळोबा बाळू वाघमोडे June 2024 ***"धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील पिक प्रारूप आणि सिंचन क्षेत्राचा एक भौगोलिक अभ्यास"*** published in ***International Journal of Advance And Applied Research*** , Impact Factor -7.38 ISSN 2347-7075 , Volume-5, No-20